ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# नाटक : कौशल्य विकसनाचे शैक्षणिक साधन

**प्रा. डॉ. शरद हरि विश्वासराव** *(Page 291-297)*
*आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे—४११००४*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

***ABSTRACT***

*कुटुंबात किंवा समाजात वावरताना बौध्दिक गुणांकाबरोबर भावनिक गुणांक महत्वाचा आहे. व्यक्तीची हुशारी बरोबरच समजूतदारपणाहीमहत्वाचा आहे. व्यक्तीचे समायोजन, सहकार्य, नेतृत्व, अभिव्यक्ती, व्यवस्थापन, निवड, व निर्णय अशा अनेक कौशल्यांचा विकास महत्वाचा आहे. शिक्षण प्रक्रियेमध्ये व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाच्या ज्ञानात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक बाजूंवर सारखाच भर देणे आवश्यक असते. परंतू आज व्यक्ती विकासाच्या ज्ञानात्मक क्षेत्राकडे काही प्रमाणात लक्ष दिले जात आहे. भावात्मक आणि क्रियात्मक क्षेत्राकडे तर सर्वसाधारणपणे दुर्लक्षच केले जाते. असे विविध संशोधनातून सिध्द झाले आहे. शिक्षणाच्या विविध व्याख्या, तत्वे,उद्दिष्टे व सैध्दांतिक पार्श्वभूमी यावरुन असे लक्षात येते की, व्यक्तिच्या बौध्दिक विकासापेक्षाही सामाजिक विकासव भावनिक विकास होणे जास्त आवश्यक आहे. कारण 'समाजपयोगी माणूस' म्हणून व्यक्तीचा विकास होणे गरजेचे आहे. शालेय जीवनामध्ये विविध शालेय, सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांतून व्यक्तिच्या बौध्दिक विकासाबरोबरच विविध कौशल्यांचे विकसन होणे जास्त आवश्यक आहे.शिक्षण प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन नाटकांचे लेखन, दिग्दर्शन व सादरीकरण करण्यास संधी दिली तर वरीलपैकी सर्व क्षमतांचा विकास होण्यास मदत होईल. नाटक याचा शैक्षणिक साधन म्हणून उपयोग केला तर व्यक्तीच्या बौध्दिक विकासाबरोबर व सामाजिक कौशल्य विकास होण्यास भरपूर मदत होते. तसेच शिक्षणाची उदिदष्टे, शिक्षणाची तत्वे नाटक या साधनाद्वारे साध्य करता येण्यास भरपूर मदत होते.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

मानवाच्या विकासामध्ये शिक्षणप्रक्रियेचा बहुमूल्य वाटा आहे. शिक्षण ही प्रक्रिया वेदकालीन किंवा त्यापूर्वीपासून सुरु झालेली आहे. आज तंत्रज्ञानाने जी प्रगती केलेली आहे ती शिक्षणामुळेच. फरक एवढाच की, शिक्षणाच्या या प्रवासात शिक्षणाची साधने व यंत्रणा वेगवेगळया होत्या.

आज शिक्षण देणारी साधने व यंत्रणा बदललेल्या आहेत. माणसाच्या जीवनात येणारा प्रत्येक प्रसंग हा सुध्दा काहीतरी शिकवून जातो. पूर्वी माणसाच्या गरजा वेगळया व मर्यादित होत्या त्यामुळे त्यावेळच्या शिक्षणाचे स्वरुप सुध्दा वेगळेच होते. आज माणसाच्या गरजा वसमस्या बदललेल्या आहेत, तसेच त्याचे स्वरुप सुध्दा बदललेले आहे. त्यामुळे शिक्षणाची व्याप्ती वाढलेली आहे. मनुष्य विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात शिक्षणाची आवश्यकता भासू लागलेली आहे. मानवाच्या विकासाची अंगे सुध्दा विज्ञानाने शोधून काढलेली आहेत. आज बौध्दिक विकासाबरोबरच भावनिक, मानसिक, शारीरिकतसेचसामाजिक विकासांची गरज निर्माण झालेली आहे. फक्त बौध्दिक विकासाच्या मदतीने मनुष्य सुखी, किंवा आनंदी होवू शकत नाही, तर त्याबरोबर वरील इतर विकासाची सुध्दा नितांत गरज आहे.परंतू दुर्दैवाने औपचारिक शिक्षण पध्दतीत फक्त बौध्दिक विकासावरच जास्त लक्ष केंद्रीत होते असे दिसून येते.

आज कुटुंबात किंवा समाजात वावरताना बौध्दिक गुणांका बरोबर भावनिक गुणांकही तेवढाच महत्वाचा आहे. व्यक्तीच्या हुशारी बरोबरच समजूतदारपणा, समायोजन, सहकार्य, नेतृत्व, अभिव्यक्ती, व्यवस्थापन, निवड, निर्णय अशा अनेक कौशल्यांचा विकास सुध्दा तेवढाच महत्वाचा आहे.

## अ) शिक्षणाच्या विविध व्याख्या

१) सॉक्रेटिस— प्रत्येक माणसाच्या मनात अद्ययावत व वैश्विक विश्वासार्हता असलेल्या कल्पना बाहेर काढणे म्हणजे शिक्षण होय.

२) जॉर्न डयूई— जात, लिंग, वर्ग आणि आर्थिक दर्जा लक्षात न घेता मानवी

क्षमतांना मुक्त करणे व त्यांचा विकास करणे म्हणजे शिक्षणहोय.

**शिक्षणाचा व्यापक अर्थः—**

डॉ. अरविंद दुनाखे यांच्या मते माणसाच्या क्षमता, कौशल्ये, अभिवृत्ती, आवड इत्यादींचा इष्ट दिशेने विकास करण्यासाठी आयोजित केलेले अनुभव म्हणजे शिक्षण होय.

- शिक्षण म्हणजे विविध कौशल्ये आत्मसात करणे.
- शिक्षण म्हणजे माणसाच्या मानसिक शक्तीचा विकास करणे होय.

**ब) शिक्षणाची तत्वेः—**

(१) विद्यार्थ्यांमध्ये अभिरुची निर्माण करणे.

(२) ज्ञाताकडून अज्ञाताकडे जाणे— विद्यार्थ्यांना विषयातील जे माहित आहे त्यापासून प्रारंभ करुन विद्यार्थ्यांना जे माहित नाही त्या भागाकडे जाणे.

(३) मूर्ताकडून अमूर्ताकडे जाणे— ज्या बाबी इंद्रियजन्य आहेत त्या बाबींकडून ज्या बाबी अमूर्त आहेत त्याकडे जाणे.

(४) विद्यार्थ्यांना कार्यप्रवण करणे वा प्रेरणा देणे.

(५) प्रत्येक विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा बुध्दी,अभियोग्यता, अभिरुची, इत्यादी बाबतीत भिन्न असतो याचे भान ठेवणे.

**क) शिक्षणाची गृहितके**

- वैयक्तिक व सामाजिक विकासासाठी शिक्षण आवश्यक असते.
- माणसाचा 'मानव' बनण्यासाठी शिक्षण आवश्यक असते.

**ड) शिक्षणाचा उद्‌देश— वैयक्तिक दृष्टीने**

- व्यक्तीचा ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियाशक्तीचा विकास करणे.
- व्यक्तीच्या सामाजिक, शारीरिक, मानसिक गरजा भागविणे.
- व्यक्तीचे चारित्र्य संवर्धन करणे.
- व्यक्तीस योग्य ती वैयक्तिक, सामाजिक मूल्ये निर्माण करणे.

- व्यक्तीस फावला वेळ कसा घालवावा याचे शिक्षण देणे.

**ई) शिक्षणाचा उद्‌देश— सामाजिक दृष्टीने**

- व्यक्तीचा सामाजिक संस्कृतीशी परिचय करुन देणे.
- व्यक्तीतील सृजनशीलतेचा विकास करण्यास मदत करणे.
- व्यक्तीचा आत्मविश्वास वाढण्यास मदत करणे.
- व्यक्तीत नाविन्याविषयी प्रेम निर्माण करणे.
- समाजाच्या विविध क्षेत्रात नेतृत्व देऊ शकणाऱ्या व्यक्तींना तयार करणे.
- परंपरा व सामाजिक परिवर्तन यांच्यात योग्य संतुलन राखण्यास मदत करणे.
- आधुनिकीकरणाचे स्वागत करण्याच्या दृष्टीने व्यक्तीचे मानसिक क्षितीज वाढविणे.
- व्यक्तीस समाजपयोगी नागरिक होण्यास मदत करणे.
- व्यक्तीस चांगला नागरिक होण्यास मदत करणे.

उ)**शिक्षण प्रक्रियेचा सैध्दांतिक पाया**

शिक्षण प्रक्रियेमध्ये व्यक्तिमत्व विकासाच्या ज्ञानात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक बाजूंवर सारखाच भर देणे आवश्यक असते. परंतू आज ज्ञानात्मक क्षेत्राकडे काही प्रमाणाततर भावात्मक आणि क्रियात्मक क्षेत्राकडे सर्वसाधारणपणे दुर्लक्षच केले जात आहे. असे विविध संशोधनातून सिध्द झाले आहे. (मूल्यनिर्धारण व मूल्यमापन—Y.C.M.O.U.)

शिक्षण प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांच्या बोधात्मक विकासाबरोबरच त्याच्या वैयक्तिक आणि सामाजिक गुणांचे संवर्धन, आणि त्याच्या अभिरुचींची जोपासना याचाही विचार झाला पाहिजे. अभ्यासाच्या क्षेत्राबरोबरच जीवनाच्या अन्य क्षेत्रात सहभागी होण्याची संधी त्याला सहशालेय कार्यक्रमातून द्यावयास हवी. (मूल्य निर्धारण व मूल्यमापन—Y.C.M.O.U.)

शिक्षणाच्या वरील विविध व्याख्या, तत्वे, उद्दिष्टे तसेच सैध्दांतिक पार्श्वभूमी यावरुन असे लक्षात येते की, शालेय जीवनामध्ये व्यक्तीच्या बौध्दिक विकासापेक्षाही सामाजिक व भावनिक विकास होणे जास्त आवश्यक आहे. कारण 'समाजपयोगी माणूस' म्हणून व्यक्तीचा विकास होणे गरजेचे आहे. परंतू आज शिक्षण प्रक्रियेत मात्र या गोष्टीकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

शालेय जीवनामध्ये विविध शालेय, सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांतून व्यक्तीच्या बौध्दिक विकासाबरोबरच विविध कौशल्यांचे विकसन होणे जास्त आवश्यक आहे.

शाळेमध्ये सहशालेय उपक्रमाद्वारे वरील सामाजिक विकासासाठी प्रयत्न केला जातो. यामध्ये नाटक, संगीत व कला यांचा सामावेश होतो. यापैकी नाटक म्हणजे नाट्यकृती व नाट्यछटा याद्वारे व्यक्तीचा सामाजिक विकास होण्यास मोठया प्रमाणात मदत होते असे वाटते.

**नाटकाद्वारे कौशल्य विकसन —**

शिक्षणाच्या विविध व्याख्यांमध्येही बौध्दिक क्षमता विकासाबरोबरच इतर क्षमतांच्या विकासावर सुध्दा भर दिलेला आहे. परंतू या क्षमतांचा विकास करावयाचा असेल तर अभ्यासक्रमातील उपक्रमाबरोबर अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम यांचाही उपयोग करणे आवश्यक ठरते. मानवाचे सामाजिकीकरण करण्यासाठी अभ्यासेतर उपक्रम अत्यंत उपयोगी ठरतात. यामध्ये प्रामुख्याने नाटक या उपक्रमामुळे भरपूर क्षमता विकसित होतात. हे प्रत्यक्ष पुढील उदाहरणावरुन दिसून येते.

उदा:— नाटक लिहिणे— यामुळे नवनिर्मिती, स्वत:चे विचार प्रभावीपणे मांडणे, परिस्थितीचे संपूर्ण आकलन, सामाजिक भान, सौंदर्यमूल्य, समाजाचे निरीक्षण इतर साहित्याचा अभ्यास, सृजनशिलता, नाविण्यपूर्णता, व्यवहार्यता, प्रभावीपणा, लेखन कौशल्य इत्यादी कौशल्य किंवा क्षमता विकसित करण्यास मदत होते.

**नाटकाचे दिग्दर्शन करताना—**

सहकार्य वृत्ती, समयसूचकता, वेळेचे नियोजन, आर्थिक नियोजन, मानवी संसाधन विकास, उपलब्ध संसाधनांचा विकास, बुध्दीमान व्यक्तीची निवड व त्यांचा जास्तीत जास्त वापर, साधेपणा तसेच भव्यता, प्रभावीपणा, कार्यक्षमतेचा जास्तीत जास्त वापर, समंजसपणा, संवेदनक्षमता, एकूण व्यवस्थापन, अभिनय कौशल्य, शब्दफेक, नेतृत्व, सहकार्य, समयसूचकता, मानवी संसाधनांचा जास्तीत जास्त वापर, उपलब्ध साहित्याचा जास्तीत जास्त वापर, यासारख्या क्षमता विकसित होण्यास मदत करतात.

**नाटकात अभिनय करताना—**अभिनय कौशल्य, शब्दफेक, वक्तृत्व, सहकार्य, समयसूचकता, आशययुक्तता, अभिव्यक्ती, परिस्थितीचे संपूर्ण आकलन, उपलब्ध साहित्यांचा जास्तीत जास्त वापर, बुध्दीचा जास्तीत जास्त वापर, सौंदर्य मूल्य, सामाजिक भान, समाजाचे निरीक्षण, साहित्याचा अभ्यास, सृजनशिलता, प्रभावीपणा, कार्यक्षमता, समंजसपणा, संवेदनशीलता, विषयज्ञान, भूमिकेतील जिवंतपणा अशा अनेक क्षमतांचा विकास यातून घडण्यास मदत होते.

**नाटकाची निर्मिती करताना—**

समयसूचकता, वेळ व पैसा याचे नियोजन, परिस्थितीचे संपूर्ण आकलन, उपलब्ध संसाधनांचा जास्तीत जास्त वापर, सामाजिक भान, समाजाचे निरीक्षण, साहित्याचा अभ्यास, नावीण्यपूर्णता, व्यवहार्यता, व्यवस्थापन, समंजसपणा, समायोजन, संवेदनशीलता, नेतृत्व, सहकार्य, समयसूचकता, यासारख्या अनेक क्षमतांचा विकास होतो.

थोडक्यातशिक्षण प्रक्रियेमध्येसुध्दा विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन नाटकांचे लेखन, दिग्दर्शन व सादरीकरण करण्यास संधी दिली तर वरीलपैकी सर्व क्षमतांचा विकास करण्यास मदत होईल.

एकूणच असे सांगता येते की, नाटकाचा शैक्षणिक साधन म्हणून उपयोग केला तर व्यक्तीच्या बौध्दिक विकासाबरोबर सामाजिक कौशल्य विकास होण्यास

भरपूर मदत होते. तसेच शिक्षणाची उदिदष्टे, शिक्षणाची तत्वे, नाटक या साधनाद्वारे साध्य करता येण्यास भरपूर मदत होते.

संदर्भ :

१) *डॉ. अरविंद दुनाखे,''प्रगतशैक्षणिकतत्वज्ञान''नित्यनूतनप्रकाशन (२००५).*

*२)प्रा.प्रकाश देशपांडे, ''मूल्यनिर्धारण व मूल्यमापन'' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक (१९९४).*